| MHKO070006772015 | **नियमित दिवाणी दावा क्र ११८/२०१५**<br>**मधील नि.७६ वरील आदेश**<br>**आनंदा राऊ भोसले वि.**<br>**बाबु भाऊ भोसले** |
|---|---|

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी पुढील मुदत मिळणेकरीता दाखल केलेला आहे. त्यास प्रतिवादी तसेच आजरोजी हजर असलेले साक्षीदार त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले.

३. यापुर्वी नि.७० वरील आदेशान्वये मोजणीदार संजय भिमराव गवळी यांना साक्षीसमन्स काढलेले होते. त्यानंतर दि.९.१०.२०२५ रोजी साक्षीदार संजय गवळी हे हजर झाले. परंतु नि.७३ वरील अर्जानुसार वादी यांनी साक्षीदाराची साक्ष घेणेस मुदतीची मागणी केली. त्यावेळी सदरचा अर्ज हा रक्कम रु.५००/- च्या खर्चावर व नियमाप्रमाणे साक्षभत्ता भरण्याच्या अटीवर मंजूर केला. त्यानंतर पुढील तारीख १३.११.२०२५ अशी देणेत आली होती. त्यानंतर प्रस्तुत तारखेस साक्षीदार संजय गवळी हजर राहीले नाहीत. तसेच वादी यांनी देखील सदर कामी कोणतीही पुढील तजवीज केली नाही, म्हणून नि.१ वर त्याअनुषंगीक आदेश पारीत केलेला आहे.

४. आजरोजी साक्षीदार संजय गवळी हे हजर आहेत असे असताना परत वादी यांनी प्रस्तुतचा मुदतीचा अर्ज दिलेला आहे. त्यामध्ये वादीचे माहितगार वकील आर.ए.मगदुम यांची तब्येत ठिक नसलेने तशी रजा मा.मुख्य न्यायाधीश कोल्हापूर

यांनी मंजूर केली असल्यामुळे मुदतीची मागणी केलेली आहे. शिवाय त्यांनी सदर गोष्टीची कल्पना साक्षीदार यांना दि.१७.१२.२०२५ रोजी फोनवरुन कळविल्याचे कथन केले आहे. सदरची बाब साक्षीदार यांनी खुल्या न्यायालयात मान्य केलेली आहे.

**५.** सदरचा दावा हा सन २०१५ पासून प्रलंबित स्वरुपात आहे. तसेच अर्जातील कारण पाहता शेवटची एक मुदत वादी यांना साक्षीदार तपासण्याकरीता देणे न्यायोचित वाटते. परंतु त्याच बरोबरीने प्रकरणात झालेला विलंब देखील दुर्लक्षीत करता येणार नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | सदरचा अर्ज हा रक्कम रु.५००/– (रुपये पाचशे फक्त) च्या खर्चावरती व साक्षीदारास नियमाप्रमाणे होणारा साक्षीभत्ता देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येतो. |
| २. | सदर खर्चाची रक्कम प्रतिवादी यांना देणेत यावी. |
| ३. | पुढील तारखेची समज साक्षीदार यांना देणेत यावी. |
| ४. | वादी यांनी पुढील तारखेस प्रस्तुत साक्षीदाराची साक्ष न घेतलेस त्याबाबतचा योग्य तो आदेश पारीत करणेत येईल. |

PATIL MAYUR SAMPAT
Digitally signed by PATIL MAYUR SAMPAT
Date: 2025.12.18 17:47:13 +0530

जयसिंगपूर (**एम.एस.पाटील**)

दिनांक–१८/१२/२०२५ २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर

जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर